# नियामक मंडळाची ३५ वी बैठक दिनांक २० ऑगस्ट २००३

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३५ वी बैठक दि.२०.८.२००३ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३५/१

''ठराव करण्यात येतो की, ३४ व्या बैठकीमध्ये पारित केलेले सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. ३५/२

''ठराव करण्यात येतो की,

अ) मुंबई उच्च न्यायालय, मुंबई व मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, येथे नुकत्याच सादर करण्यात आलेल्या जनहितार्थ याचिकेच्या अनुषंगाने, महामंडळाचे हित लक्षात घेऊन (Public Interest Litigation & Writ Petition) महामंडळाची भूमिका प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयात मांडण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ब) वरील विषयाचे महत्व लक्षात घेता, तसेच त्याचे महामंडळाच्या कामांच्या भविष्यांतील नियोजनावर व प्रकल्पांच्या पूर्णत्वावर होणारे दूरगामी परिणाम विचारात घेता, महामंडळाची भूमिका न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडण्यासाठी श्री. तुळजापूरकर अगर अन्य सक्षम सिनिअर कौन्सेल यांची नियुक्ती करण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. या कार्यवाहीसाठी आवश्यक ती फी अदा करण्यासाठी तसेच इतर अनुषंगिक खर्च करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. योग्य ते सक्षम सिनिअर कौन्सेल यांचे नेमणुकीची व त्यांची फी निश्चित करण्याची कार्यवाही मा. अध्यक्ष यांचे स्तरावर करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

क) वरील विषय महामंडळामार्फत मांडण्याच्या दृष्टिने महामंडळाचे सद्य:स्थितीतील तांत्रिक सल्लागार श्री.देवकुळे, यांची कामाची वाढीव व्याप्ती विचारांत घेऊन नेमणूक करण्यास व त्या अनुषंगाने पूर्वीच्या मान्य दराने मानधन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३५/३

''ठराव करण्यांत येतो की,

अ. मुठा डावा कालवा किमी. ८ ते २७ मधील ९३ एकर २७ गुंठे इतके क्षेत्र पुणे महानगरपालिकेला टी.डी.आर. च्या बदल्यात कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्याचा नियामक मंडळाच्या ३३ व्या बैठकीतील ठराव क्र. ३३/२ हा रद्द करण्यात येत आहे.

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ब. पुणे महानगरपालिकेशी सध्या अस्तित्वात असलेला करारनामा रद्द करुन, वरील जागा महामंडळाच्या ताब्यात घेऊन ही जागा महामंडळास आवश्यक नसल्यामुळे पाटबंधारे विभाग व महसूल विभागाच्या अशा विषयाबाबतच्या प्रचलित विहीत कार्यपद्धतीच्या अधीन राहून जाहीर लिलावाद्वारे थेट विक्री करुन त्याद्वारे तात्काळ महसूल प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३५/४

''ठराव करण्यात येतो की, ए.आय.बी.पी. अंतर्गत मंजूर झालेल्या कर्जसहाय्याचा पुरेपूर वापर करण्यासाठी या प्रकल्पांना आवश्यक निधी महामंडळाने वर्ष २००३-०४ च्या कार्यक्रमामध्ये उपलब्ध करुन देण्यास व त्यानुषंगाने ए.आय.बी.पी. अंतर्गत घटकांची कामे पूर्ण करण्यासाठी चालू निविदा कार्यरत ठेवण्यास व आवश्यकतेनुसार नव्याने निविदा स्वीकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३५/५

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २००३-२००४ च्या रु.४७८९.१० कोटी भांडवली खर्चाचे पाणीपट्टी महसूल रु.१५० कोटी इतका जमेस धरुन सुधारीत अर्थसंकल्पास तसेच सन २००४-२००५ चे रु.१४६५.६० कोटी भांडवली खर्चाचे अंदाजपत्रकास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत असून हा अर्थसंकल्प मंजूरीसाठी शासनास सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. ३५/६

ठराव करण्यांत येतो की, गट क्र. २०५ मौजे पाकणी, ता.उत्तर सोलापूर येथे उजनी प्रकल्प कारंबा शाखा किमी क्र. ३७, ३८ च्या संपादित क्षेत्रामध्ये श्री.प्रशांत प्रभाकर चांदणे यांना विहीरीसाठी किमान आवश्यक जागा २५ वर्षाच्या दीर्घमुदतीच्या भाडेपट्टयाने महामंडळाच्या/ शासनाच्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन देण्यास व नियमानुसार विहीरीवरील पाणीपट्टीच्या आकारणीच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.''.

ठराव क्र. ३५/७

''ठराव करण्यात येतो की, शासनाच्या पाटबंधारे वित्तीय महामंडळामार्फत सर्व पाटबंधारे महामंडळासाठी पाटबंधारे वित्तीय महामंडळामार्फत निधी उभारण्याच्या कार्यवाहीस योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने व त्यामुळे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास अद्यापपर्यंत निधी प्राप्त होऊ शकला नसल्याने, महामंडळाकडील मोठ्या प्रमाणावरील प्रलंबित दायित्व कमी करणे व इतर आवश्यक कामे सुरु करणे या दृष्टीकोनातून महामंडळास अनुज्ञेय असलेल्या मर्यादेत, स्वतंत्रपणे रोखेविक्रीद्वारे निधी उभारण्याची

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

परवानगी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास मिळावी, असा सर्वकष प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३५/८

''ठराव करण्यात येतो की,

१. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात महामंडळाने यापूर्वी वेळोवेळी मान्य केलेल्या ठरावांनुसार पाणीपट्टीचे दर दरवर्षी ठरविण्यात यावेत व त्यानुसार ठरविलेले दर १.७.२००३ पासून महामंडळाच्या कार्यक्षेत्रात लागू करण्यात यावेत.

२. वरील (१) प्रमाणे ठरविलेले जे दर शासनाच्या दरापेक्षा कमी असतील, ते दर शासनाच्या प्रचलित दराप्रमाणे ठेवण्यात यावेत.

३. शासकीय जलाशय व नदीतून खाजगी उपसा सिंचनासाठी घनमापन पद्धतीचा पाणीपट्टी दर नियामक मंडळाचे २५ व्या बैठकीतील ठराव क्र. २५/६ प्रमाणे, पुढील कालावधीसाठी चालू ठेवण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. (जोडपत्र -२अ)

४. ३० मीटर पेक्षा वरील उंचीवरील उपसा सिंचन योजनांचे पाणीपट्टी स्वामित्व शुल्काचे दर नियामक मंडळाच्या २६ व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र. २६/७ ब प्रमाणे राहतील.''

ठराव क्र. ३५/९

''ठराव करण्यात येतो की, लघु पाटबंधारे तलाव बोरपाडळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर व लघु पाटबंधारे तलाव बोरीवडे ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या दोन प्रकल्पांची कामे खाजगीकरणांतर्गत ''बांधा, वापरा व हस्तांतरित करा (बीओटी)'' या तत्वावर 'वारणा विविध उद्योग व शिक्षण समूह' या संस्थेस देण्याबाबत नियामक मंडळाच्या ठराव क्र. ३३/३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्या ठरावात नमूद करण्यात आलेल्या 'वारणा विविध उद्योग व शिक्षण समूह' या संस्थेऐवजी 'श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर' या संस्थेस हे काम बीओटी तत्वावर देण्याबाबत व त्यानुसार शासनास प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.३५/१०

''ठराव करण्यात येतो की, वेस्टर्न हॅचरिज प्रा. लि. बोर, ता. मावळ जि.पुणे यांच्या दंडनीय दराने आकारणी केलेल्या पाणीपट्टी संदर्भात शासनाचे धोरण प्रसृत झाल्यानंतर त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ठराव क्रमांक ३५/११

"ठराव करण्यात येतो की, साठवण तलावाच्या कामांमधून विमोचकाचे काम वगळण्याबाबतचा विषय क्र. ११ विषयसूचीतून वगळण्यात येत आहे."

आयत्या वेळचे विषय

ठराव क्र. ३५/१२

''ठराव करण्यात येतो की, नीरा देवधर प्रकल्पाच्या अंशतः घळभरणीमुळे जून २००० मध्ये बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना तात्पुरते निवारे उभारण्यासाठी देण्यात आलेले सुमारे रु. ५.७५ लक्ष इतकी घसारा किंमत असलेले साहित्य प्रकल्पाची पुनर्वसनाची कामे अद्याप पूर्ण झाली नसल्याने संबंधित प्रकल्पग्रस्तांकडे कायमस्वरुपी राहू देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३५/१३

''ठराव करण्यात येतो की, नीरा देवधर ता. भोर, जि. पुणे या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील साळव, दापकेघर, कोंढरी, देवधर, परहर खुर्द या ५ गावांतील प्रकल्पग्रस्तांना आयुक्त, पुणे विभाग यांच्या प्रस्तावानुसार रु.५५,१३,२६३ इतके सानुग्रह अनुदान, दिलासा रक्कम व व्याज यापोटी मंजूर करण्याची विनंती शासनास करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३५/१४

''ठराव करण्यात येतो की, ए.आय.बी.पी. योजनेअंतर्गत असलेल्या प्रकल्पांसाठी सदरच्या प्रकल्पांची कामे विहीत वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून खाजगी वाटाघाटीने जमिनी संपादित करण्यास अनुमती मिळावी, असा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे